ePaper
288 पैकी कुणाला निवडायचे हे 13 जुलैनंतर ठरणार : जरांगे



‖ वर्ष - 7 । अंक - 360 ‖ UDYAM-MH-26-0158827 ‖

# महाईन्यूज ™

**आतील पानांत**

- जगज्जेत्या टीम इंडियावर पैशांचा पाऊस
- सूर्या दादाच्या कॅचने फिरवली मॅच!
- कमल हासन आश्चर्यचकित झाले
- विमानतळांच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह!

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 01 जूलै 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## मतमोजणीसाठी प्रशासन सज्ज, 30 टेबलांवर होणार मोजणी

# आज ठरणार शिक्षक आमदार!

## » शिक्षक आमदार कोण होणार, फैसला आज, कोण गुलाल उधळणार, उत्सुकता शिगेला

। नाशिक । महाईन्यूज

**नाशिक विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीची मतमोजणी आज, सोमवारी (दि. १ जुलै) अंबड औद्योगिक वसाहतीमधील केंद्रीय वखार महामंडळाच्या गोदामात होणार आहे. त्याद्वारे शिक्षक आमदार कोण होणार याचा फैसला आज होत असून, नेमके कोण गुलाल उधळणार याबाबतची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.**





नाशिक विभाग शिक्षक मतदारसंघासाठी दि. २६ जून रोजी मतदान प्रक्रिया राबविण्यात आली. गेल्या आठवड्यात नाशिकसह अहमदनगर, जळगाव, धुळे आणि नंदुरबार या पाचही जिल्ह्यांत मतदान घेण्यात आले. विभागात ९३.४८ टक्के शिक्षक मतदारांनी मतदानाचा हक्क बजावत २१ उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद केले. नाशिक विभागातील पाच जिल्ह्यांत एकूण ६४ हजार ८४८ मतदारांनी मतदान केले. गतवेळच्या तुलनेत यंदा मतदानाची टक्केवारी वाढल्याने मतदारांमध्ये निकालाची उत्सुकताही वाढली आहे. निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार आज, सोमवारी मतमोजणी होणार आहे. मतमोजणीसाठी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले असून, संपूर्ण यंत्रणा सज्ज झाल्याची माहिती प्रशासनाने दिली. एकाच ठिकाणी पाचही जिल्ह्यांची मतमोजणी होणार असून, तयारीवर रविवारी अखेरचा हात फिरविण्यात आला. मतमोजणीत जो उमेदवार पहिल्या पसंतीत विजयाचा कोटा पूर्ण करेल तो विजयी ठरणार आहे. मतमोजणीच्या पूर्ण प्रक्रियेला किमान ८ ते १० तासांचा कालावधी लागण्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली आहे.

### डॉ. गेडाम यांची पाहणी

निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गडाम यांनी मतमोजणी केंद्राची पाहणी केली. बॅलेट पेपरवर मतदान घेण्यात आले असून, २१ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. त्यामुळे मतमोजणीची प्रक्रिया वेळखाऊ राहणार आहे. ही प्रक्रिया सुरळीत पार पडेल याची खबरदारी घ्या, अशा सूचना गेडाम यांनी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना केल्या आहेत. याशिवाय कायदा आणि सुव्यवस्था राखली जाईल याची काळजी घ्या, अशा सूचनाही करण्यात आल्या आहेत. यावेळी जिल्हाधिकारी जलज शर्मा, पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, अहमदनगरचे जिल्हाधिकारी सिद्धराम सालीमठ, जळगावचे जिल्हाधिकारी आयुषप्रसाद, धुळ्याचे जिल्हाधिकारी अभिनव गोयल, नंदुरबारच्या जिल्हाधिकारी मनीषा खत्री, अपर आयुक्त तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी नीलेश सागर व विभागातील अन्य अधिकारी उपस्थित होते.

### मतमोजणी कक्षात मोबाइलला बंदी

सकाळी आठ वाजता मतमोजणीच्या प्रक्रियेला सुरुवात होणार आहे. वखार महामंडळाच्या गोदामाच्या परिसरात मतमोजणी कक्ष, निरीक्षक कक्ष, सुरक्षा कक्ष, माध्यम कक्ष तयार करण्यात आला आहे. ३० टेबलांवर मोजणीची प्रक्रिया राबविली जाणार आहे. येथील प्रकाशव्यवस्था, वीजपुरवठा, आरओ, एआरओ बैठकव्यवस्था, उमेदवारांसाठी बैठकव्यवस्थेसह आवश्यक त्या कक्षांची उभारणी करण्यात आली आहे. मतमोजणी कक्षात मोबाइल घेऊन जाण्यास बंदी राहणार आहे. मतमोजणीसाठी अधिकारी-कर्मचारी नियुक्त करण्यात आले असून, त्यांनी जबाबदारी दिलेल्या ठिकाणीच थांबावे, तसेच उमेदवारांच्या मतमोजणी प्रतिनिधींनीदेखील नियुक्ती दिलेल्या ठिकाणीच थांबावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

### ...अशी आहे तयारी

-मतमोजणीसाठी ९० अधिकाऱ्यांची नियुक्ती
-सकाळी आठपासून मोजणी प्रक्रियेला सुरुवात
-विभागातील प्रत्येक जिल्ह्यासाठी प्रत्येकी सहा याप्रमाणे ३० टेबलांची व्यवस्था
-प्रत्येक टेबलवर एक पर्यवेक्षक, दोन मतमोजणी अधिकारी नियुक्त
-प्रत्येकी सहा टेबलची जबाबदारी एका जिल्हाधिकाऱ्यांकडे राहणार
-विभागातील पाचही जिल्हाधिकारी मोजणीला राहणार उपस्थित
-मतमोजणीच्या पहिल्या टप्प्यात पाचही जिल्ह्यांच्या मतपत्रिकांची होणार सरमिसळ
-मतपत्रिकांचे ५०-५० चे गठ्ठे तयार केले जाणार
-या गठ्ठ्यांमधून वैध आणि अवैध मतपत्रिका बाजूला केल्या जाणार
-वैध मतपत्रिकांचे प्रत्येकी एक-एक हजारांचे गठ्ठे केले जाणार
-वैध मतपत्रिकांच्या आधारे विजयासाठीचा कोटा निश्चित होणार

### विधानपरिषद निवडणुकीत कोण कोण रिंगणात?

**मुंबई शिक्षक मतदार संघामध्ये पाच उमेदवारांमध्ये लढत**

**ज. मो. अभ्यंकर :** शिवसेना ठाकरे गट
**शिवनाथ दराडे :** भाजप
**सुभाष मोरे :** शिक्षक भारती
**शिवाजी शेंडगे :** शिवसेना शिंदे गट पुरस्कृत उमेदवार
**शिवाजी नलावडे :** राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट

**मुंबई पदवीधर मतदारसंघातील प्रमुख उमेदवार**

**अनिल परब :** शिवसेना ठाकरे गट
**किरण शेलार :** भाजप

**कोकण पदवीधर मतदारसंघ**

**निरंजन डावखरे :** भाजप
**रमेश कीर :** काँग्रेस

**नाशिक शिक्षक मतदारसंघ :**

**किशोर दराडे :** शिवसेना
**विवेक कोल्हे :** अपक्ष
**संदीप गुळवे :** शिवसेना ठाकरे गट
**महेंद्र भावसार :** राष्ट्रवादी काँग्रेस

# एकाच कुटुंबातील पाच जण वाहून गेले!

## धबधब्याच्या प्रवाहातून 10 पैकी पाच जण सुखरूप वाचले

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोणावळ्यात वर्षाविहारासाठी गेलेले पाच जण भुशी धरणात वाहून गेले आहेत. भुशी धरणाच्या पाठीमागे असलेल्या जंगलातील वॉटर फॉलमध्ये पर्यटक हे थेट भुशी धरणात वाहून गेले. यात लहान मुले, महिलांचा समावेश आहे. त्यांचं शोधकार्य सुरू आहे. अन्सारी कुटुंब असल्याचं पोलिसांकडून सांगण्यात आले आहे.**



### पोलिसांनी पर्यटकांना केले हे आवाहन

मृत्यू झालेल्या महिलेच वय ३६ तर दोन्ही मुलींचं वय हे १३ आणि ८ वर्षे आहे. इतर ४ वर्षाची मुलगी आणि ९ वर्षाच्या मुलाचा शोध सुरू आहे. दुपारी एकच्या सुमारास ही घटना घडली होती. लोणावळा येथे डोंगराळ भागातील धबधब्यावर पावसाचा आनंद घेणे कुटुंबाच्या जीवावर बेतले आहे. पुण्यातील हडपसर येथील पाच जण धबधब्याच्या पाण्याच्या प्रवाहात वाहून गेले असून तिघांचा मृत्यू झाला आहे. तर, दोघांचा शोध सुरू आहे. रात्र झाल्याने शोधकार्य थांबविण्यात आले आहे. साहिस्ता लियाकत अन्सारी वय- ३६ वर्षे, अमिमा सलमान उर्फ आदिल अन्सारी वय- १३ वर्षे, उमेरा सलमान उर्फ आदील अन्सारी वय- ८ वर्षे या तिघांचा मृत्यू झाला आहे. या तिघांचा मृतदेह मिळाला आहे.

लोणावळ्यात वर्षाविहासाठी गेलेले पाच जण वाहून गेले आहेत. अन्सारी हे कुटुंब भुशी धरणाच्या वर असलेल्या जंगलात वॉटर फॉल (बॅक वॉटर) येथे वर्षाविहाराचा आनंद घेत होते. तेव्हा, पाच जण या वॉटर फॉलमधून भुशी धरणात वाहून गेल्याचे लोणावळा पोलिसांनी माहिती दिली आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातून पर्यटक लोणावळ्यात दाखल होत आहेत. भुशी धरण देखील ओव्हरफ्लो झालं असून पर्यटकांची गर्दी होत आहे.धरणात वाहून गेलेल्या महिला आणि दोन मुलींचा मृतदेह मिळाला आहे. मृत्यू झालेल्या महिलेच वय ३६ तर दोन्ही मुलींचं वय हे १३ आणि ८ वर्षे आहे. इतर ४ वर्षाची मुलगी आणि ९ वर्षाच्या मुलाचा शोध सुरू आहे. दुपारी एकच्या सुमारास ही घटना घडली होती.लोणावळा येथे डोंगराळ भागातील धबधब्यावर पावसाचा आनंद घेणे कुटुंबाच्या जीवावर बेतले आहे. पुण्यातील हडपसर येथील पाच जण धबधब्याच्या पाण्याच्या प्रवाहात वाहून गेले असून तिघांचा मृत्यू झाला आहे. तर, दोघांचा शोध सुरू आहे. रात्र झाल्याने शोधकार्य थांबविण्यात आले आहे. साहिस्ता लियाकत अन्सारी वय- ३६ वर्षे, अमिमा सलमान उर्फ आदिल अन्सारी वय- १३ वर्षे, उमेरा सलमान उर्फ आदील अन्सारी वय- ८ वर्षे या तिघांचा मृत्यू झाला आहे. या तिघांचा मृतदेह मिळाला आहे. अदनान अन्सारी वय- ४ वर्षे आणि मारिया अन्सारी वय- ९ वर्षे या दोघांचा शोध सुरू आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पुण्यातील हडपसर भागातून लियाकत अन्सारी आणि युनूस खान हे त्यांच्या १७ ते १८ कुटुंबातील सदस्यांसोबत लोणावळ्यात वर्षाविहाराचा आनंद घेण्यासाठी गेले होते. दोन्ही कुटुंब हे हे दुर्गम भागातील धबधब्यावर गेले होते. हा धबधबा भुशी धरणाच्या पाठीमागे आहे. डोंगराळ भागात असल्याने तिथे कोणी जाण्याचा प्रयत्न करत नाही. खान आणि अन्सारी दोन्ही कुटुंब एकमेकांसोबत वर्षाविहाराचा आनंद घेत होते. गेल्या दोन- तीन दिवसांपासून सतत कोसळत असलेल्या पावसामुळे अचानक ज्या धबधब्याच्या पाण्यात हे कुटुंब थांबले तिथं अचानक पाण्याचा प्रवाह वाढला. त्या पाण्याच्या प्रवाहात दहा जण अडकले. पैकी, ५ जण पाण्याच्या प्रवाहातून बाहेर पडण्यात यशस्वी झाले. पण पाच जण पाण्याच्या प्रवाहात वाहून गेले. पैकी तिघांचा मृतदेह मिळाला आहे. दोघांचा शोध सुरू आहे.लोणावळा, खंडाळा भागात वर्षाविहारासाठी येणाऱ्या पर्यटकांनी अनोळखी ठिकाणी जाऊ नये. आपला आणि आपल्या कुटुंबाचा जीव धोक्यात घालू नये. भुशी डॅम परिसर, घुबड तलाव, टाटा डॅम, तुंगार्ली डॅम, राजमाची पॉईंट, भागात पर्यटकांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करावे अस लोणावळा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुहास जगताप यांनी आवाहन केले आहे.भुशी धरणाच्या पाठीमागे डोंगर आहे. त्या डोंगरातून अनेक धबधबे वाहतात. धबधब्याच्या पाण्याचा प्रवाह थेट भुशी धरणाच्या तलावात येतो. भुशी धरण देखील आजच ओव्हर फ्लो झाला असून रविवारचा दिवस असल्याने अनेक पर्यटकांनी भुशी धरण्यावर गर्दी केली होती या भुशी धरणावर देखील अनेक पर्यटक हे हुल्लडबाजी करतात.अन्सारी हे कुटुंब भुशी धरणाच्या वर असलेल्या जंगलात वॉटर फॉल (बॅक वॉटर) येथे वर्षाविहाराचा आनंद घेत होते. तेव्हा, पाच जण या वॉटर फॉलमधून भुशी धरणात वाहून गेल्याचे लोणावळा पोलिसांनी माहिती दिली आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातून पर्यटक लोणावळ्यात दाखल होत आहेत.

# पुण्यात झिकाचा धोका वाढला! गर्भवतीला संसर्ग

## संसर्ग झालेल्या गर्भवतीची सोनोग्राफी चाचणी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**एरंडवणे परिसरातील एका गर्भवतीला झिकाचा संसर्ग झाल्याचे समोर आले आहे. त्यामुळे शहरातील झिकाची एकूण रुग्णसंख्या पाचवर गेली आहे. रुग्ण आढळून आलेल्या एरंडवणे आणि मुंढवा परिसरात महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून तापाच्या रुग्णांचे सर्वेक्षण सुरू आहे.**




### महिलेची प्रकृती स्थिर

एरंडवण्यातील गणेशनगर परिसरातील गर्भवतीला झिकाचा संसर्ग झाल्याचे समोर आले आहे. संसर्ग झालेल्या गर्भवतीची मे महिन्यात सोनोग्राफी चाचणी करण्यात आली होती. त्या अहवालात झिकाचा काहीही परिणाम दिसून आलेला नाही. या महिलेची प्रकृती स्थिर आहे. तिच्यामध्ये झिकाची कोणतीही लक्षणे दिसून आलेली नाहीत, अशी माहिती आरोग्य विभागाने दिली.एरंडवणे परिसरात आधी झिकाचे दोन रुग्ण आढळले होते. त्यात ४६ वर्षीय डॉक्टर आणि त्यांच्या १५ वर्षीय मुलीचा समावेश होता. आता या परिसरात एका गर्भवतीला संसर्ग झाला आहे. याचबरोबर मुंढव्यात ४७ वर्षीय महिला आणि तिचा २२ वर्षीय मुलगा यांना झिकाचा संसर्ग झाला आहे.

एरंडवण्यातील गणेशनगर परिसरातील गर्भवतीला झिकाचा संसर्ग झाल्याचे समोर आले आहे. संसर्ग झालेल्या गर्भवतीची मे महिन्यात सोनोग्राफी चाचणी करण्यात आली होती. त्या अहवालात झिकाचा काहीही परिणाम दिसून आलेला नाही. या महिलेची प्रकृती स्थिर आहे. तिच्यामध्ये झिकाची कोणतीही लक्षणे दिसून आलेली नाहीत, अशी माहिती आरोग्य विभागाने दिली.एरंडवणे परिसरात आधी झिकाचे दोन रुग्ण आढळले होते. त्यात ४६ वर्षीय डॉक्टर आणि त्यांच्या १५ वर्षीय मुलीचा समावेश होता. आता या परिसरात एका गर्भवतीला संसर्ग झाला आहे. याचबरोबर मुंढव्यात ४७ वर्षीय महिला आणि तिचा २२ वर्षीय मुलगा यांना झिकाचा संसर्ग झाला आहे. यामुळे शहरातील एकूण रुग्णसंख्या पाचवर गेली आहे. रुग्णांच्या संपर्कात आलेले आणि तापाची लक्षणे असलेले त्यांचे कुटुंबीय आणि इतर व्यक्तींचे रक्ताचे नमुने तपासणीसाठी राष्ट्रीय विषाणुविज्ञान संस्थेकडे (एनआयव्ही) पाठविण्यात आले आहेत.झिकाचे रुग्ण आढळून आलेल्या परिसरात प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरू आहेत. एरंडवणे आणि मुंढव्यात रुग्ण आढळलेल्या परिसरात प्रत्येकी १०० घरांच्या आतमध्ये धूर फवारणी करण्यात आली आहे. कारण झिकाचे डास घरांच्या आतमध्येही आढळून येतात. याचबरोबर बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणांची डासोत्पत्ती स्थाने शोधून नष्ट केली जात आहेत. तसेच, या प्रकरणी इमारतमालकांना नोटिसाही बजावल्या जात आहेत.

## पिंपरी-चिंचवडमध्ये राष्ट्रवादीत राजकीय भूकंप

# शरद पवारांचा अजित पवारांना ‘जोर का झटका’!

### शहराध्यक्ष अजित गव्हाणेंसह 16 माजी नगरसेवक प्रवेश करणार: येत्या 5 जुलैरोजी प्रवेशाचा मुहूर्त; शहरातील राजकीय समीकरण बदणार

## » शहराध्यक्ष तुषार कामठे यांच्या उपस्थितीमध्ये निर्णायक बैठक

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवडमध्ये अजित पवारांच्या राष्ट्रवादीला मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे. पिंपरी चिंचवड हा अजित पवारांचा बालेकिल्ला मानला जातो. मात्र आता याच बालेकिल्ल्याला शरद पवार सुरुंग लावण्याच्या तयारीत आहेत. पिंपरी चिंचवडच्या राष्ट्रवादीच्या शहराध्यक्ष अजित गव्हाणेंसह 16 नगरसेवकांनी काल मोदी बागेत शरद पवारांची भेट घेतली आहे. तर अजित पवार गटातील भोसरीचे माजी आमदार विलास लांडे हे शरद पवारांची भेट घेण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे यांच्या उपस्थितीमध्ये निर्णायक बैठक झाली असून, येत्या ५ जुलैरोजी पक्षप्रवेशाचा मुहूर्त ठरला आहे.**



राष्ट्रवादी अजित पवार गटाचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांच्यासह 16 नगरसेवकांनी मोदीबागेत शरद पवाराची भेट घेतली. त्यावेळी शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे आणि माजी नगरसेविका सुलक्षणा शिलवंत धर यांच्यासह प्रदेश उपाध्यक्ष व पिंपरी-चिंचवड निरीक्षक प्रकाश म्हस्के उपस्थित होते. लोकसभा निवडणूक संपल्यानंतर आता समस्त महाराष्ट्राला विधानसभा निवडणुकचे वेध लागले आहे. राजकीय पक्षांनीदेखील या निवडणुकीच्या अनुषंगाने आपली तयारी चालू केली आहे. दुसरीकडे नेतेमंडळींना आपल्या मतदारसंघात लोकांशी गाठीभेटी वाढवल्या आहेत. तर काही नेते तिकीट मिळवण्यासाठी वरिष्ठांची मनधरणी करण्याच्या प्रयत्नात आहेत. काही नेते आपली राजकीय सोय बघून पक्षबदल करण्याचीही शक्यता व्यक्त केली जात आहे. राजकीय घडामोडींनीही वेग आला आहे. अजित पवारयांच्या राष्ट्रवादीला मोठे खिंडार पडणार आहे.

### भोसरी विधानसभेत ‘तुतारी’ निश्चित...

दरम्यान, अजित पवार गटातील भोसरीचे माजी आमदार विलास लांडे आज शरद पवारांची भेट घेण्याची शक्यता आहे. कारण, अजित गव्हाणे यांच्यासोबत विलास लांडे यांचा मुलगा माजी नगरसेवक विक्रांत लांडे बैठकीला उपस्थित होते. तसेच, लांडेंच्या सोबत अजित पवार गटाचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे आणि माजी नगरसेवकांसह 15 पदाधिकारी ही शरद पवारांच्या तालमीत परतण्याचे निश्चित झाले आहे. लोकसभेत शरद पवारांचा चाललेला करिश्मा पाहून विलास लांडे घरवापसी करण्याच्या तयारीत आहेत. मात्र भोसरी विधानसभा विलास लांडे आणि त्यांचे नातेवाईक अजित गव्हाणे ही लढण्यास तीव्र इच्छुक आहेत. परंतु, महाविकास आघाडीमध्ये या जागेवर शिवसेना ठाकरे गटाने दावा केला आहे.

परंतु, लांडे आणि गव्हाणे यांचा शरद पवार गटातील संभाव्य प्रवेश पाहाता ही जागा ‘तुतारी’वर लढण्याचे निश्चित झाल्याचे चित्र आहे. त्यामुळे ठाकरे गटाचे तीव्र इच्छुक सुलभा उबाळे आणि धनंजय आल्हाट यांची भूमिका काय? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

---

## सुप्रिया सुळेंनी तुकाराम महाराजांच्या पादुकांचे घेतले दर्शन

## » राज्य सरकारवर केली सडकून टीका

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या पादुकांचं खासदार सुप्रिया सुळे यांनी पती सदानंद सुळे यांच्यासह दर्शन घेतलं. पिंपरी- चिंचवड शहरातील दापोडीत पालखीचा हा शेवटचा विसावा असून यानंतर तुकोबांची पालखी पुण्याकडे मार्गस्थ होईल. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली आणि तुकोबांच्या पालखीची संगमवाडी या ठिकाणी भेट होईल. दोन दिवस दोन्ही पालख्या पुण्यात मुक्कामी असतील.**



खासदार सुप्रिया सुळे यांनी राज्य सरकारवर सडकून टीका केली. विधानसभा तोंडावर आल्यामुळे राज्य सरकारला लाडकी बहीण भाऊ सगळं आठवायला लागले. सध्या जुमल्यांचा पाऊस पडतोय. मागील सव्वावर्षापासून राज्याच्या गृह विभागाचा कारभार बिघडला आहे. राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर झाला आहे.

पुण्यातील पोर्षे कार अपघात प्रकरणात बरेच घोळ झाल्याचे आपण बघितलं. बीडमधील तणावग्रस्त परिस्थिती हे गृह विभागाचे अपयश असल्याचे सांगत सुप्रिया सुळे यांनी राज्य सरकारच्या कारभारावर टीका केली.

### कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर

यावेळी सुप्रिया सुळे म्हणाल्या, “महाराष्ट्रात चांगला पाऊस पडू दे आणि अडचणीत आलेल्या बळीराजाला सुखावू दे ही प्रार्थना, विधानसभा तोंडावर आल्यामुळे राज्य सरकारला लाडकी बहीण भाऊ सगळं आठवायला लागले सध्या जुमल्यांचा पाऊस पडतोय. सरकारकडून वारकरी यांच्या दिंड्याला दिले जाणार अनुदान केवळ जुमला आहे तीन महिन्यावर निवडणुका आल्यामुळे सरकार काय काय देईल हे आता बघावे लागेल. असं सुप्रिया सुळे म्हणाल्या. मागील सव्वा वर्षापासून राज्याच्या गृह विभागाच्या कारभार बिघडला आहे, राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर झाला आहे. बीड मधील तणावग्रस्त परिस्थितीवर सुप्रिया सुळे यांच वक्तव्य, गृह विभागाच अपयश म्हणत निशाणा साधला. तसेच एक भारतीय म्हणून वर्ल्ड कप जिंकल्याचा आनंद आहे मात्र सगळे श्रेय क्रिकेट खेळणाऱ्या खेळाडूंच आहे. असं देखील त्या यावेळी बोलत होत्या.

# लई भारी जिंकलो!



## भूमिका

**एखादा जबरदस्त थ्रिलिंग सस्पेन्स सिनेमा पाहाताना एक साधारण अपेक्षा अशी असते की, हा सिनेमा बघताना एकदा तरी आपण आपलीच नखं पोटभरून खाल्ली पाहिजेत. आणि खाण्यासाठी नखंही कमी पडली पाहिजेत, अशी परिस्थिती आल्यावर आपल्याला कशाचच भान राहत नाही. क्षणभर आपण स्वत:च नाव आणि सगळेच विसरून जातो. आणि त्याचा शेवट पाहिल्यावर जे समाधान मिळते त्या सुखाला आणि समाधानाला तोड नाही.**



असच काहीस बार्बाडोस येथे झालेल्या २०/२० विश्व चषकातील भारत दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या अंतिम सामन्याच्यावेळी वाटत होतं. शेवट पर्यंत म्हणजे अगदी मिलर चा तो सुर्यकुमार यादव याने घेतलेल्या अफलातून झेलापर्यंत आणि त्यानंतर शेवटच्या चेंडू पर्यंत फक्त आणि फक्त आपल्याला रोमहर्षक अन ऐतिहासिक आणि अविस्मरणीय असं काहीतरी आपण बघतोय असं वाटत होतं. आजपर्यंत असं नुसत वाचत आणि ऐकत होतो, की अमुक एक गोष्ट ही कमजोर हृदयाच्या लोकांसाठी नाही, वैगरे वैगरे, पण त्या गोष्टीचा प्रत्यय आज प्रथमच घेतला. खरच ही रोहित शर्मा च्या नेतृत्वाखालील भारतीय टीम ही अफाट गुणांनी भरलेली आहे. फलंदाजी म्हणू नका, गोलंदाजी म्हणू नका, क्षेत्ररक्षण म्हणू नका, या विश्वचषकामध्ये आपण सर्वच्या सर्व गोष्टी अगदी अचूक आणि निडर होऊन केल्या आहेत. जिंकण्याची ईर्ष्या सर्वतोपरी हाच मूळ उद्देश आणि याच्यानंतर दुनिया संपते हे डोळ्यात अन मनात साठवलेलं अन मुरवलेल वाक्य घेऊन अक्षरश: जीवाची बाजी लावणे म्हणजे हा विश्वविक्रम!फलंदाजीत या विश्वचषकात रोहित शर्मा, ऋषभ पंत, सुर्यकुमार यादव, हार्दिक पांड्या आणि शेवटच्या सामन्यात ज्याने अफाट फलंदाजी केली तो म्हणजे विराट कोहली या सगळ्यांनी कमाल केली.खर म्हणजे एक वाक्य क्रिकेट समीक्षकांना लिहायला नेहमी आवडतं, की हा संघाचा विजय आहे. हा संघाचा पराभव आहे. वैगरे वैगरे . पण हा भारतीय संघाचा झालेला विजय हा खरच संपूर्ण संघाचा विजयच आहे. संपूर्ण खेळलेल्या अकरा पैकी अकरा जणांनी यात स्वत:च कौशल्य दाखवून हा विजय खेचून आणला आहे. कुणी फलंदाजी केलीये, कुणी गोलंदाजीने कमाल दाखवलीये, कुणी अफाट क्षेत्ररक्षणाने सामना खेचून आणलाय आणि या सगळ्यात संघभावनेला सर्वोच्च प्राधान्य या आपल्या भारतीय संघाच्या प्रत्येक खेळाडूने दिलय. कुठेही स्वार्थ नाही, नसते हेवेदावे नाही. ड्रेसिंग रूम मध्ये कधीही कॅमेरा न्या सगळेजण एकत्र बसलेत अन आपल्या साथीदारांचा खेळ एन्जॉय करताहेत. मजा मस्ती चालू आहे. आणि याचे श्रेय जेवढे संघाला तेवढेच संपूर्ण संघव्यवस्थापनाला जाते. की त्यांनी ड्रेसिंग रूम मधील वातावरण हसत खेळत कस राहील हे पाहिलं. आणि त्या तशा मोकळ्या ढाकळ्या वातावरणामुळे प्रत्येक खेळाडूला खूप काही चांगलं खेळण्याची प्रेरणा मिळाली. आता थोडे प्रशिक्षक राहुल द्रविड आणि कर्णधार रोहित शर्मा विषयी ... खरेखुरे विजयीवीर म्हणजे प्रशिक्षक राहुल द्रविड आणि कर्णधार रोहित शर्मा यांच्या नेतृत्वाविषयी, खरतर या विश्वविजयाचे श्रेय बाकी खेळाडू न एवढेच या दोघानाही मिळायलाच हवे. जसे पराभवानंतर या दोन व्यक्तीना धारेवर धरले जाते तसे विजयात यांना वाटा मिळायलाच हवा. विशेषकरून प्रशिक्षक राहुल द्रविड ला तर नक्कीच, तो या अशा विजयासाठी फारच आतुर असणार, तसं म्हंटल तर आपल्या प्रशिक्षणाच्या कामाच्या शेवटच्या दिवशी त्याचा तो हक्कच होता. आजपर्यंत तो खेळत असतानाही त्याला अनेकदा यशाने त्याला हुलकावणी दिली आहे. विशेषत: तो जेव्हा कर्णधार होता, तेव्हा २००७ सालच्या वनडे विश्वचषकामध्ये भारताला लाजीरवाणा पराभव स्वीकारावा लागला होता. ज्यामध्ये राहुल द्रविड चा काहीच दोष नव्हता. अन तरीही अपयशाचे खापर कर्णधार म्हणून त्याच्यावरच फोडण्यात आले. त्याकाळात जे काही विजय आपल्याला मिळाले असतील त्याचे थेट श्रेय हे कधीच राहुल द्रविडला दिले गेले नाही. हा नियतीने त्याच्यावर केलेला अन्यायच होता. पण नियतीने त्याची नुकसान भरपाई अगदी व्यवस्थित केली, ते त्याला २०/२० मध्ये विश्वविजय देऊन..... त्याचे नेतृत्व सक्षम होते आणि आहे, हेच आता इतिहासात सुवर्ण अक्षरांनी कोरले जाणार आहे. (आमच्यासारख्या राहुल द्रविड भक्तांना काल फारच भरून आले .) कर्णधार रोहित शर्माचीही तीच गोष्ट २०२३ च्या ५०-५० विश्वचषकामध्ये अंतिम सामन्यात जो पराभव झाला होता आणि त्या आधी WORLD TEST CHAMPIONSHIP मध्ये जे यशाने हुलकावणी दिली होती, त्यामुळे रोहित शर्माच्या नेतृत्वावर चाहते प्रश्नचिन्ह लावत होते.

**- लेखक : हर्षल आल्पे**

## प्रासंगिक »

# शोधीत जाऊ विठ्ठला

***...गरिबांस संपत्तीनिर्मितीत सहभागी करून घेण्याऐवजी तथाकथित 'जनकल्याण योजना' राबवल्याने मते मिळतातच असे नाही.***

मग ती वि. स. पागे यांची सत्तरच्या दशकात साकारलेली रोजगार हमी योजना असो वा महिलांस राखीव जागा देणारी शरद पवार यांनी यशस्वीपणे राबवलेली योजना असो! तो काळ लोटला. अलीकडचा महाराष्ट्र हा अनुकरण करणारा- हिंदी भाषक राज्यांची कॉपी करणारा- बनू लागला असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ताजी 'लाडकी बहीण' योजना हा त्याचा एक नमुना. तसेच 'तीर्थक्षेत्र यात्रा' ही कल्पना आणि मुख्यमंत्र्यांच्या समर्थकांचा शिंदे यांस महाराष्ट्राचा 'बुलडोझर बाबा' बनवण्याचा हुच्चपणा हेदेखील अशा कॉपी करणाऱ्या महाराष्ट्राचे नमुनेपण तसे नाही. आर्थिक, सामाजिक आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे शैक्षणिक आघाडीवर महाराष्ट्र झपाट्याने रसातळास निघालेला असताना आणि ही घसरण थांबवणे अत्यावश्यक असताना त्याची कसलीही जाणीव राज्यकर्त्यांस नसणे हे अधिक वेदनादायक ठरते.

तब्बल १३ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर ट्वेन्टी-२० जगज्जेतेपद... ' हा उल्लेख भारतीय क्रिकेट संघाविषयी वारंवार केला जात आहे, कारण क्रिकेटच्या इवल्याशा विश्वात क्रिकेटच्या बाबतीत सर्वांत श्रीमंत आणि सर्वाधिक संसाधनसमृद्ध अशा या देशाला जागतिक विजेतेपद मिळवण्यासाठी इतकी प्रतीक्षा करावी लागणे अपेक्षित नव्हते.

# 13 वर्षांच्या दुष्काळानंतर...!

पण निव्वळ पैशाने मैदानावरील कामगिरी घडवून आणता येत नाही. भारतीय संघाच्या बाबतीत मुद्दा प्रत्येक स्पर्धेतील चांगल्या कामगिरीचा नव्हता; तर मोक्याच्या सामन्यांमध्ये गळपटण्याचा होता. गेल्या दोन एकदिवसीय विश्वचषक स्पर्धांमध्ये (२०१९, २०२४) साखळी स्तरावर सर्वोत्तम कामगिरी करूनही अनुक्रमे उपान्त्य आणि अंतिम सामन्यांमध्ये भारतीय संघ निस्तेज ठरला होता. तीच गत ट्वेन्टी-२० प्रकाराची. या प्रकारात जगातील सर्वांत श्रीमंत क्रिकेट स्पर्धा अर्थात आयपीएल भारतात खेळवली जाते. पण २००७मध्ये पहिल्या-वहिल्या ट्वेन्टी-२० जगज्जेतेपदानंतर भारताची झोळी रितीच राहिली होती. तरी आयपीएल मात्र जोरात, जोशात सुरू होती. या काळात कधी अंतिम सामन्यात, कधी उपान्त्य सामन्यात पराभूत होण्याची मालिका सुरूच राहिली. काही वर्षांपूर्वी कसोटी विश्वचषक स्पर्धा सुरू झाली. तीत तर दोन वेळा अंतिम फेरीपर्यंत धडकून चषकाने हुलकावणी



दिली. या अशा अनेक हुकलेल्या विजयक्षणांमुळे हुरहूर, संशय, नैराश्य वर्षानुवर्षे साचून राहिले होते. रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय क्रिकेट संघाने शनिवारी या साचलेल्या भावनांचा प्रथम निचरा केला आणि विश्वविजयाच्या अत्यंत सुखद, जल्लोषपूर्ण भावनांना लाखो भारतीय क्रिकेटप्रेमींच्या मनोविश्वात लोटले. भारतीय वेळेनुसार शनिवारी मध्यरात्री भारताच्या दुसऱ्या ट्वेन्टी-२० जगज्जेतेपदावर शिक्कामोर्तब केले आणि उर्वरित रात्र भारतभर उत्साहात, उत्सवात जागवली गेली. विजयाची वस्तुनिष्ठ चिकित्सा करताना या नैराश्यकोंडव्याची आणि उत्साहसांडव्याची दखल घ्यावीच लागते. अंतिम सामन्यात विजय अत्यंत खडतर होता. त्यामुळेच त्याची खुमारी अधिक. एक तर समोर दक्षिण आफ्रिका होता, जो जगज्जेतेपदासाठी भारताइतकाच तृषार्त होता. भारताची अंतिम सामन्यापर्यंतची मजल झोकात होती. परंतु मोक्याच्या सामन्यात सुरुवातीपासूनच सारे काही बिघडू लागले. कर्णधार रोहित शर्मा चटकन बाद झाला, बाकीचेही बाद होत गेले. निश्चल उभा राहिला विराट कोहली- ज्याची त्या टप्प्यापर्यंत स्पर्धेतली कामगिरी अतिशय सुमार ठरली होती. भारताच्या दोन्ही फिरकी गोलंदाजांकडून अपेक्षा होती, पण तेच महागडे ठरले. शेवटच्या काही षटकांमध्ये तर विजयावर दक्षिण आफ्रिकेने शिक्कामोर्तब केलेच होते. अशा कसोटीच्या क्षणीच खेळ उंचावण्यासाठी असीम मनोधैर्य लागते, जे जसप्रीत बुमराने पुरवले. एखादी असामान्य क्षणैक कामगिरी लागते, जी सूर्यकुमार यादवने करून दाखवली. निग्रही एकाग्रता लागते, जी हार्दिक पंड्याने दाखवली. आणि या सगळ्यांस नियंत्रित करणारे, लक्ष्यापासून ढळू न देणारे अविचल नेतृत्व लागते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील)
एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# आज जागतिक खोके दिवस!

## मुख्यमंत्री शिंदेंच्या पोस्टवरून आदित्य ठाकरेंचा टोला

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिवसेनेत पडलेल्या फुटीला आणि राज्यातील महायुतीच्या सरकारला दोन वर्षे पूर्ण झाले आहेत. या निमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट लिहिली आहे. या पोस्टमध्ये मुख्यमंत्री शिंदे यांनी महायुती सरकारच्या दोन वर्षांच्या काळातील कामासंदर्भात भाष्य केलं आहे.**



'विचार..विकास..आणि विश्वास... राज्यात सत्तेवर आलेल्या सामान्यांच्या सरकारला आज दोन वर्षे होत आहेत. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा विचार, राज्याच्या विकासाचा ध्यास आणि सामान्यांचा विश्वास यांच्या बळावर महायुती सरकारने दोन वर्षांची यशस्वी वाटचाल केली', असं मुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटलं आहे. मुख्यमंत्री शिंदे यांनी केलेल्या या पोस्टवर शिवसेना ठाकरे गटाचे नेते, आमदार आदित्य ठाकरे यांनी भाष्य करत 'आज जागतिक खोके आणि धोके दिवस साजरा होत आहे', असा खोचक टोला लगावला आहे.आज जागतिक खोके आणि धोके दिवस साजरा होत आहे. निर्लज्जपणे आज खोके दिवस साजरा केला जातोय. जे घाबरट आहेत, डरपोक आहेत. ते पक्ष चोरतात. वडील चोरतात. स्वत:च्या बॅनरवर दुसऱ्यांचे वडील यांना लागतात. हे अशी लोक आहेत", असा टोला आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लगावला.विचार, विकास आणि विश्वास! राज्यात सत्तेवर आलेल्या सामान्यांच्या सरकारला आज दोन वर्षे होत आहेत. हिंदुहृदयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांचा विचार, राज्याच्या विकासाचा ध्यास आणि सामान्यांचा विश्वास यांच्या बळावर महायुती सरकारने दोन वर्षांची यशस्वी वाटचाल केली. या दोन वर्षांच्या काळात देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे भक्कम पाठबळ लाभले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार आणि सर्व सहकाऱ्यांची समर्थ साथ लाभली. राज्यातील जनतेनं दिलेलं प्रेम, शिवसैनिकांची साथ आणि महायुतीमधील पक्षांचा उत्तम समन्वय यामुळे लोकहिताची शेकडो कामे मार्गी लागली", असं मुख्यमंत्री शिंदेंनी म्हटलं. मुख्यमंत्री शिंदे पुढं म्हणाले, "राज्यातील शेतकरी, कष्टकरी, महिला, ज्येष्ठ आणि युवकांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हसू उमटवता आले. आम्ही घेतलेल्या निर्णयावर राज्यातील जनतेनेही विश्वासाची मोहर उमटवत साथ दिली, याचा अभिमान आहे आणि त्यातून निर्माण झालेल्या जबाबदारीचे भानही आहे. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेबांच्या संस्कारामुळेच घडू शकले. हेच विचार आणि संस्कार घेऊन पुढील वाटचाल करायची आहे. विकास साधायचा आहे आणि विश्वास वृद्धिंगत करायचा आहे. गेल्या दोन वर्षांत पाठीशी ठाम उभे राहिलेल्या प्रत्येक व्यक्तीचे ऋण व्यक्त करण्यासाठी माझ्याकडे शब्द नाही. प्रत्येक घटकाचे अंतःकरणापासून आभार. जय हिंद, जय महाराष्ट्र", असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पोस्टमध्ये म्हटलं आहे.'विचार.. विकास..आणि विश्वास... राज्यात सत्तेवर आलेल्या सामान्यांच्या सरकारला आज दोन वर्षे होत आहेत. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा विचार, राज्याच्या विकासाचा ध्यास आणि सामान्यांचा विश्वास यांच्या बळावर महायुती सरकारने दोन वर्षांची यशस्वी वाटचाल केली', असं मुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटलं आहे. मुख्यमंत्री शिंदे यांनी केलेल्या या पोस्टवर शिवसेना ठाकरे गटाचे नेते, आमदार आदित्य ठाकरे यांनी भाष्य करत 'आज जागतिक खोके आणि धोके दिवस साजरा होत आहे', असा खोचक टोला लगावला आहे.आज जागतिक खोके आणि धोके दिवस साजरा होत आहे.

### मुख्यमंत्री शिंदेंची पोस्ट काय?

निर्लज्जपणे आज खोके दिवस साजरा केला जातोय. जे घाबरट आहेत, डरपोक आहेत. ते पक्ष चोरतात. वडील चोरतात. स्वत:च्या बॅनरवर दुसऱ्यांचे वडील यांना लागतात. हे अशी लोक आहेत", असा टोला आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लगावला.विचार, विकास आणि विश्वास! राज्यात सत्तेवर आलेल्या सामान्यांच्या सरकारला आज दोन वर्षे होत आहेत. हिंदुहृदयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांचा विचार, राज्याच्या विकासाचा ध्यास आणि सामान्यांचा विश्वास यांच्या बळावर महायुती सरकारने दोन वर्षांची यशस्वी वाटचाल केली. या दोन वर्षांच्या काळात देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे भक्कम पाठबळ लाभले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार आणि सर्व सहकाऱ्यांची समर्थ साथ लाभली. राज्यातील जनतेनं दिलेलं प्रेम, शिवसैनिकांची साथ आणि महायुतीमधील पक्षांचा उत्तम समन्वय यामुळे लोकहिताची शेकडो कामे मार्गी लागली", असं मुख्यमंत्री शिंदेंनी म्हटलं.मुख्यमंत्री शिंदे पुढं म्हणाले, "राज्यातील शेतकरी, कष्टकरी, महिला, ज्येष्ठ आणि युवकांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हसू उमटवता आले. आम्ही घेतलेल्या निर्णयावर राज्यातील जनतेनेही विश्वासाची मोहर उमटवत साथ दिली, याचा अभिमान आहे.

# येत्या काळात बरेच धमाके होणार : संदिपान भुमरे

## सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यात पुढील काही महिन्यांनी विधानसभेची निवडणूक जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे महायुती आणि महाविकास आघाडीचे नेते आतापासून विधानसभा निवडणुकीच्या तयारीला लागले आहेत.**

या निवडणुकीच्या अनुषंगाने अनेक नेत्यांचे मतदारसंघात दौरे वाढले आहेत. तसेच महायुती आणि महाविकास आघाडीत जागावाटपासंदर्भात चर्चा सुरु आहेत.दुसरीकडे पावसाळी अधिवेशनात महायुती सरकारच्यावतीने आगामी विधानसभा पाहता मोठ्या घोषणाही केल्या आहेत. यावरून सत्ताधारी आणि विरोधक यांच्यामध्ये आरोप-प्रत्यारोपाचे राजकारण सुरु आहे. या पार्श्वभूमीवर बोलताना शिवसेना शिंदे गटाचे नेते, खासदार संदिपान भुमरे यांनी सूचक विधान केलं आहे. 'येत्या काळात बरेच धमाके होणार आहेत. अनेकजण संपर्कात



आहेत', असं संदिपान भुमरे यांनी आज माध्यमांशी बोलताना म्हटलं आहे.पैठण तालुक्यातील बिडकिन येथील सरपंचांसह अन्य काही कार्यकर्त्यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला. यावेळी बोलताना संदिपान भुमरे म्हणाले, "पैठण तालुक्यात शिवसेना भक्कमपणे पुढे जात आहे. या कार्यकर्त्यांना माझ्या कामाचा अनुभव होता. काही कारणास्थव ते बाजूला गेले होते. पण आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं काम पाहून अनेक कार्यकर्ते शिवसेना शिंदे गटात प्रवेश करत आहेत. येत्या काळात अजून बरेच धमाके होणार आहेत. ग्रामीण भागातील किंवा शहरातील अनेकजण शिवसेना शिंदे गटात प्रवेश करणार आहेत", असं संदिपान भुमरे यांनी म्हटलं.भुमरे पुढे बोलताना म्हणाले, लोकसभा निवडणुकीत मी सांगितलं होतं की, छत्रपती संभाजीनगरची महायुतीची जागा एक ते दीड लाखांच्या फरकाने निवडून येईन.

### संजय राऊतांना खुलं आव्हान

संजय राऊतांना आमच्यावर आरोप करण्यापलिकडे काय काम आहे? संजय राऊत हे सकाळी आरोप करतात. यापलिकडे राऊतांकडे काहीही नाही. शिवसेना ठाकरे गटाने किती जागा लढवल्या आणि किती निवडून आल्या. तसेच शिवसेना शिंदे गटाने किती जागा लढवल्या आणि किती निवडून आल्या, हे सर्वांनी पाहिलं. आम्हाला उमेदवारी उशीरा मिळाली अन्यथा अजून आमच्या जागा वाढल्या असत्या. विधानसभा निवडणुकीत जास्तीत जास्त जागा कशा येतील.

# विमानतळांच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह!

## देशात वेगवेगळ्या विमानतळांवर दुर्घटना घडल्या

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

देशात मुसळधार पावसात तीन वेगवेगळ्या विमानतळांवर दुर्घटना घडल्या आहेत. गुरुवारी जबलपूर, शुक्रवारी दिल्ली आणि शनिवारी राजकोट विमानतळाच्या छतांचा भाग कोसळला. यापैकी दिल्ली आंतरराष्ट्रीय विमानतळावर घडलेली दुर्घटना अधिक गंभीर होती. त्यामध्ये एका कॅब चालकाचा मृत्यू झाला आणि आठ अन्य जखमी झाले. या दुर्घटनांमुळे विमानतळ सुविधांची सुरक्षा आणि आराखडा याबाबतच प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहेत.



जबलपूर विमानतळाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केवळ तीन महिन्यांपूर्वी, १० मार्च रोजी केले होते. २७ जूनला झालेल्या पावसात या विमानतळाच्या छताचा भाग कोसळला आणि त्यामध्ये आयकर विभाग अधिकाऱ्याच्या वाहनाचे नुकसान झाले. दुसऱ्याच दिवशी, २८ जूनला जोरदार पावसानंतर दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या टर्मिनल-१ येथे छताचा भाग कोसळून रमेश कुमार या कॅबचालकाचा मृत्यू झाला आणि आठजण जखमी झाले. ४ महिन्यांपूर्वीच पंतप्रधान मोदींनी या टर्मिनलच्या अद्ययावतीकरणानंतर उद्घाटन केले होते.गुजरातमधील राजकोट विमानतळाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या वर्षी जुलैमध्ये केले होते. नागरी हवाई उड्डाण मंत्रालयाने माहिती दिली की, विमानतळाच्या छतावर साचणारे पाणी काढून टाकण्यासाठी दुरुस्तीचे काम सुरू असतानाच शनिवारी त्याचा काही भाग कोसळला. त्यात कोणतेही नुकसान झाले नाही. तिन्ही दुर्घटनांचे तत्कालिक कारण मुसळधार पाऊस असले तरी, विरोधक आणि तज्ज्ञांनी सुरक्षेसंबंधी शिथिल नियमन आणि काम पूर्ण करण्याची घाई याकडे अंगुलीनिर्देश केला आहे. मोदी यांनी भारतात दुबई आणि सिंगापूरच्या धर्तीवर मोठ्या संख्येने विमानतळे उभारण्याचा निर्धार केला आहे. त्यांच्या कार्यकाळात देशातील विमानतळांची जवळपास दुपटीने वाढून १४० झाली असून या दशकाच्या अखेरीस त्यांची संख्या २२० करण्याचे लक्ष्य आहे. मात्र, वेगाच्या मागे धावताना गुणवत्तेवर तडजोड करता कामा नये असे विश्लेषक अमेय जोशी यांनी 'रॉयटर्स'ला सांगितले. तसेच सध्याच्या बांधकामांचे लेखापरीक्षण करण्यासाठी यंत्रणा असणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.जबलपूर विमानतळाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केवळ तीन महिन्यांपूर्वी, १० मार्च रोजी केले होते. २७ जूनला झालेल्या पावसात या विमानतळाच्या छताचा भाग कोसळला आणि त्यामध्ये आयकर विभाग अधिकाऱ्याच्या वाहनाचे नुकसान झाले. दुसऱ्याच दिवशी, २८ जूनला जोरदार पावसानंतर दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या टर्मिनल-१ येथे छताचा भाग कोसळून रमेश कुमार या कॅबचालकाचा मृत्यू झाला

### तीन दिवसांत तीन दुर्घटना

मोदी यांनी भारतात दुबई आणि सिंगापूरच्या धर्तीवर मोठ्या संख्येने विमानतळे उभारण्याचा निर्धार केला आहे. त्यांच्या कार्यकाळात देशातील विमानतळांची जवळपास दुपटीने वाढून १४० झाली असून या दशकाच्या अखेरीस त्यांची संख्या २२० करण्याचे लक्ष्य आहे. मात्र, वेगाच्या मागे धावताना गुणवत्तेवर तडजोड करता कामा नये असे विश्लेषक अमेय जोशी यांनी 'रॉयटर्स'ला सांगितले. तसेच सध्याच्या बांधकामांचे लेखापरीक्षण करण्यासाठी यंत्रणा असणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.देशात मुसळधार पावसात तीन वेगवेगळ्या विमानतळांवर दुर्घटना घडल्या आहेत. गुरुवारी जबलपूर, शुक्रवारी दिल्ली आणि शनिवारी राजकोट विमानतळाच्या छतांचा भाग कोसळला. यापैकी दिल्ली आंतरराष्ट्रीय विमानतळावर घडलेली दुर्घटना अधिक गंभीर होती. त्यामध्ये एका कॅब चालकाचा मृत्यू झाला आणि आठ अन्य जखमी झाले. या दुर्घटनांमुळे विमानतळ सुविधांची सुरक्षा आणि आराखडा याबाबतच प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहेत. दुसऱ्याच दिवशी, २८ जूनला जोरदार पावसानंतर दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या टर्मिनल-१ येथे छताचा भाग कोसळून रमेश कुमार या कॅबचालकाचा मृत्यू झाला आणि आठजण जखमी झाले.

आणि आठजण जखमी झाले. ४ महिन्यांपूर्वीच पंतप्रधान मोदींनी या टर्मिनलच्या अद्ययावतीकरणानंतर उद्घाटन केले होते.गुजरातमधील राजकोट विमानतळाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या वर्षी जुलैमध्ये केले होते. नागरी हवाई उड्डाण मंत्रालयाने माहिती दिली की, विमानतळाच्या छतावर साचणारे पाणी काढून टाकण्यासाठी दुरुस्तीचे काम सुरू असतानाच शनिवारी त्याचा काही भाग कोसळला. त्यात कोणतेही नुकसान झाले नाही. तिन्ही दुर्घटनांचे तत्कालिक कारण मुसळधार पाऊस असले तरी, विरोधक आणि तज्ज्ञांनी सुरक्षेसंबंधी शिथिल नियमन आणि काम पूर्ण करण्याची घाई याकडे अंगुलीनिर्देश केला आहे.

# आपली श्रद्धा आपल्याला कर्तव्य करण्यास शिकवते

## सुनक यांनी लंडनमधील स्वामीनारायण मंदिराला दिली सपत्निक भेट!

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

ऋषी सुनक हे हिंदू धर्माबद्दल नेहमीच आग्रही असतात. हिंदू मंदिरांना भेट देणं, हिंदू धर्मातील तत्त्वे अंगीकारणे आदी गोष्टींमुळे ऋषी सुनक नेहमीच चर्चेत असतात. आता त्यांनी लंडनमधील एका मंदिराला भेट दिल्यानंतर मला भगवद्गीतेवर संसद सदस्य म्हणून शपथ घेतल्याचा अभिमान आहे, असं सुनक यांनी म्हटलं आहे. तसंच, धर्मामुळे मला प्रेरणा मिळते असंही ते म्हणाले. या भेटीत ऋषी सुनक यांच्या पत्नी अक्षता मूर्तीही त्यांच्याबरोबर होत्या.

ब्रिटनमध्ये लवकरच निवडणुका होऊ घातल्या आहेत.त्यापार्श्वभूमीवर त्यानी लंडनच्या श्री स्वामीनारायण मंदिराला भेट दिली. या भेटीत सुनक यांनी उपासकांना संबोधित केलं आणि सार्वजनिक सेवेतील त्यांच्या दृष्टीकोनातील मार्गदर्शक तत्व म्हणून धर्माबद्दल ते बोलले. ते म्हणाले, "आता मी एक हिंदू आहे आणि तुमच्या सर्वांप्रमाणेच मला माझ्या (हिंदू धर्मावरील) विश्वासातून प्रेरणा आणि दिलासा मिळतो. भगवद्गीतेवर संसद सदस्य म्हणून शपथ घेतल्याचा मला अभिमान आहे."ते पुढे म्हणाले, "आपली श्रद्धा आपल्याला आपले कर्तव्य करण्यास शिकवते आणि जोपर्यंत कोणी ते निष्ठेने करतं तोपर्यंत परिणामाबद्दल घाबरू नये. माझ्या



प्रेरणेने मला हेच मानायला शिकवले आहे. मी माझे जीवन जगण्याचा प्रयत्न करतो आणि तेच मला माझ्या मुलींना द्यायचे आहे, जे मला सार्वजनिक सेवेसाठी मार्गदर्शन करते", असंही ते पुढे म्हणाले.या मंदिरात ऋषी सुनक यांनी काही वेळ घालवला. त्यांनी पुजाऱ्यांशी संवाद साधला. हिंदू समाजातील मुलांनी आता फक्त डॉक्टर, वकील,

### शपथ घेतल्याचा अभिमान

आणि सार्वजनिक सेवेतील त्यांच्या दृष्टीकोनातील मार्गदर्शक तत्व म्हणून धर्माबद्दल ते बोलले. ते म्हणाले, "आता मी एक हिंदू आहे आणि तुमच्या सर्वांप्रमाणेच मला माझ्या (हिंदू धर्मावरील) विश्वासातून प्रेरणा आणि दिलासा मिळतो. ऋषी सुनक हे हिंदू धर्माबद्दल नेहमीच आग्रही असतात. हिंदू मंदिरांना भेट देणं, हिंदू धर्मातील तत्त्वे अंगीकारणे आदी गोष्टींमुळे ऋषी सुनक नेहमीच चर्चेत असतात. आता त्यांनी लंडनमधील एका मंदिराला भेट दिल्यानंतर मला भगवद्गीतेवर संसद सदस्य म्हणून शपथ घेतल्याचा अभिमान आहे, असं सुनक यांनी म्हटलं आहे. तसंच, धर्मामुळे मला प्रेरणा मिळते असंही ते म्हणाले.

अकाऊंटंट होणं पुरेसं नाहीय", असं पुजाऱ्यांनी म्हणताच ऋषी सुनक म्हणाले, "आता माझे आई-वडील इथे असते आणि तुम्ही त्यांना असे विचारले असते तर कदाचित ते तुम्हाला म्हणाले असते की मी डॉक्टर, वकील किंवा अकाऊंटंट झाले असतो तर त्यांनी ते पसंत केले असते.ब्रिटनमध्ये लवकरच निवडणुका होऊ घातल्या आहेत. त्यापार्श्वभूमीवर त्यानी लंडनच्या श्री स्वामीनारायण मंदिराला भेट दिली. या भेटीत सुनक यांनी उपासकांना संबोधित केलं .

# बिग बींचा अभिनय पाहून कमल हासन आश्चर्यचकित झाले

अभिताभ बच्चन, कमल हसन स्टारर 'कल्की : २८९८ एडी' चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. २७ जूनला प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने बॉक्स ऑफीसवर धुमाकूळ घातला आहे. तेलुगु, तमिळ, मल्याळम, हिंदी अशा विविध भाषेत हा चित्रपट प्रदर्शित झाला आहे. चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर नुकत्याच झालेल्या पत्रकार परिषदेत कमल हसन यांनी चित्रपट आणि कल्की चित्रपटातील अमिताभ बच्चन यांच्या अभिनयाबाबत वक्तव्य केले आहे.चित्रपटाबद्दल बोलताना कमल हसन म्हणतात- "भारतीय चित्रपट हा जागतिक मनोरंजनाच्या व्यासपीठावर जात असल्याचे याआधी आपण पाहिले आहे आणि या वाटचालीत नाग आश्विन यांनी दिग्दर्शित केलेला 'कल्की २८९८ एडी' हा चित्रपट देखील आहे. कोणतीही धार्मिक तेढ न करता नाग आश्विनने अत्यंत काळजीपूर्वक पौराणिक कथांचा विषय हाताळला आहे. संपूर्ण जगभरातून फक्त जपान, चीन आणि ग्रीक संस्कृतीच गोष्ट सांगण्याच्या भारतीय वारशाच्या जवळ पोहोचू शकल्या आहेत. अश्विनने त्यातून कथा निवडल्या आहेत आणि सगळ्यांना एकत्र आणून खूप संयमाने हा चित्रपट साकारला आहे."पुढे सांगताना कमल हसन यांनी बीग बींचे कौतुक केले आहे. ते म्हणतात- "मला समजत नाही, या व्यक्तीला दिग्गज



अभिनेता म्हणावे की या क्षेत्रात पाऊल ठेवलेला नव्या ऊर्जेचा अभिनेता म्हणावे. तितक्या ताकदीने अमिताभ बच्चन यांनी कल्की चित्रपटात काम केले आहे. असे वाटते की, हा चित्रपट लहान मुलांसाठी बनवला गेला आहे. आता हे विचारू नका, केस पांढरे झालेले लोक हा चित्रपट पाहू शकतात की नाही, चित्रपटाचा आनंद घेऊ शकतात की नाही. कारण चित्रपट पाहताना तुमच्यातील प्रत्येक प्रौढ व्यक्तीला स्वत:मधील लहान मुलाची आठवण येणार आहे. हा एक उत्तम प्रयत्न होता आणि मला आनंद आहे की अशा चित्रपटाचा मला भाग होता आले. हा प्रवास असाच सुरू राहणार आहे." असे कमल हसन यांनी म्हटले आहे. दरम्यान, कल्की हा चित्रपट प्रेक्षकांच्या पसंतीस पडत असून प्रेक्षकांनी या चित्रपटासाठी गर्दी करण्यास सुरुवात केली आहे. प्रदर्शित झाल्याच्या पहिल्याच दिवशी संपूर्ण भारतात ९५ कोटींचा गल्ला या चित्रपटाने जमवला होता, तर जगभरात ६५ कोटींचा व्यवसाय केला होता.

## भारतीय अभिनेत्री पाकिस्तान दौऱ्यावर

७० च्या दशकातील दिग्गज अभिनेत्री मुमताज खूप लोकप्रिय आहेत. आता त्या चित्रपटांमध्ये काम करत नसल्या तरी सोशल मीडियावर खूप सक्रिय आहेत. त्या इन्स्टाग्रामवर त्यांचे फोटो व व्हिडीओ शेअर करत असतात. त्या अनेक विषयांवर आपली मतं मांडत असतात. मुमताज सध्या पाकिस्तानला गेल्या आहेत, तिथून त्यांनी काही फोटो व व्हिडीओ शेअर केले आहेत. मुमताज या व्हिडीओंमध्ये हाउस पार्टीचा आनंद लुटताना दिसत आहेत. त्यांनी शेअर केलेल्या पोस्टमध्ये अनेक पाकिस्तानी कलाकार दिसत आहेत. त्यांनी पाकिस्तानी गायक गुलाम अली यांच्याबरोबरचा एक फोटो शेअर केला आहे.दरम्यान, मुमताज काही दिवसांपूर्वी झीनत अमान यांच्यावर टीका केल्यामुळे चर्चेत होत्या. झीनत यांनी तरुणांना लग्नाआधी लिव्ह इनमध्ये राहण्याचा सल्ला दिला होता.

## आरुषीने गुपचूप लग्न उरकलं

'लव्ह आज कल २' फेम अभिनेत्री आरुषी शर्मानि गुपचूप लग्न उरकलं आहे. तिच्या लग्नाचे काही फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. अभिनेत्रीने बॉलीवूडमधील सुप्रसिद्ध कास्टिंग डायरेक्टरशी लग्नगाठ बांधली आहे. तिने अद्याप लग्नाचे फोटो सोशल मीडियावर शेअर केले नाही, पण तिच्या लग्नात हजर असलेल्या मंडळींनी काही फोटो पोस्ट केले आहेत. 'काला पानी' या वेब सीरिजमध्ये शेवटची दिसलेली आरुषी शर्मानि आयुष्यभरासाठी तिचा जोडीदार निवडला आहे. अभिनेत्रीने १८ एप्रिल रोजी हिमाचल प्रदेशमध्ये लग्नगाढ बांधली. तिने प्रसिद्ध कास्टिंग डायरेक्टर वैभव विशांतशी गुपचूप लग्न केलं. आरुषी आणि वैभवने अत्यंत खासगी सोहळ्यात सात फेरे घेतले. या लग्नाला फक्त त्यांचे कुटुंबीय आणि काही जवळचे मित्र उपस्थित होते.आरुषी शर्माच्या लग्नाचे फोटो खूप व्हायरल होत आहेत. ती पेस्टल रंगाचा लेहेंग्यामध्ये खूप सुंदर दिसत आहे. वैभवनेही खूप सुंदर अशी नक्षीदार शेरवानी घातली आहे.आत्तापर्यंत त्याने 'बडे मियाँ छोटे मियाँ', 'पीके', 'तेरी बातों में ऐसा उलझा जिया' आणि 'बदलापूर' सारख्या जवळपास ५० चित्रपटांसाठी कास्टिंगचं काम केलं आहे. विशेष म्हणजे वैभवने 'काला पानी' या वेब सीरिजसाठी कास्टिंग डायरेक्टर म्हणूनही काम पाहिलं होतं.



## राजकुमार रावने प्लास्टिक सर्जरी केली

आपल्या अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजविणारा बॉलीवूड अभिनेता राजकुमार राव दिलजीत दोसांझच्या कॉन्सर्टमध्ये दिसल्यापासून चर्चेत आहे. या कॉन्सर्टमध्ये अभिनेता नेहमीपेक्षा थोडा वेगळा दिसत होता. दरम्यान, या कॉन्सर्टमधील राजकुमारचे पापाराझींनी काढलेले फोटो सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले आणि राजकुमारने प्लास्टिक सर्जरी केल्याच्या चर्चांना उधाण आलं. त्यावर आता राजकुमारनं मौन सोडलं आहे. नुकत्याच 'बॉलीवूड हंगामा'ला दिलेल्या मुलाखतीत राजकुमार राव म्हणाला, "मी कोणतीही प्लास्टिक सर्जरी केली नाही आहे. व्हायरल झालेला फोटो फक्त एक वाईट फोटो होता,असं आपण म्हणू शकतो. त्या फोटोला टच-अप्स केले आहेत. मला खूपदा वाटतं की, माझी त्वचा अशी नितळ आणि चमकदार असती, तर किती चांगलं झालं असतं. कारण- त्या फोटोत मी तसाच दिसत होतो. मी तेव्हा कोणताच मेकअप केला नव्हता; पण मलाही वाटलं की, तो फोटो खूप विचित्र दिसत होता. कॅमेऱ्यात कैद झालेला तो एक वाईट क्षण होता. मी कोणतीही प्लास्टिक सर्जरी केलेली नाही."आठ वर्षांअगोदर मी हनुवटीसाठी काही फिलर वर्क केलेलं. कारण- मला आत्मविश्वास असल्यासारख दिसायचं होतं. तेव्हा माझ्या त्वचाशास्त्रज्ञानं मला सल्ला दिला होता आणि मी त्याप्रमाणे केलं. त्यानंतर माझा आत्मविश्वास वाढला का? तर हो. त्यानंतर मी आणखी चांगले चित्रपट केले आहेत आणि त्यामुळे माझा दृष्टिकोन बदलला आहे. अभिनय हे दृश्य माध्यम आहे. माझा याला विरोध नाही. जर एखाद्याला त्याचा आत्मविश्वास वाढवायचा असेल आणि विज्ञान उपलब्ध असेल, तर कोणी ते का करणार नाही.

## गोविंदाची भाची आरती मंदिरात करणार लग्न



गोविंदाची भाची व अभिनेत्री आरती सिंह लवकरच लग्नबंधनात अडकणार आहे. अभिनेत्रीने सांगितलं की तिचं लग्न डेस्टिनेशन वेडिंग नसेल तर ती मंदिरात लग्न करणार आहे. आरती व दिपक यांचं अरेंज मॅरेज आहे. ते गेल्या वर्षी जुलैमध्ये भेटले होते, त्यानंतर एकत्र वेळ घालवल्यानंतर लग्न करण्याचा निर्णय घेतला. ती दिपक चौहानशी २५ एप्रिलला मुंबईतील इस्कॉन मंदिरात लग्न करणार आहे. "मी दागिने घालणार नाही किंवा लग्नाआधीचे कोणतेही कार्यक्रम नसतील, असं नाही. सर्व काही होईल. मी लूक कसा करायचा ते ठरवलंय आणि हेवी ज्वेलरी मी लग्नाच्या दिवशी घालेन. पण मला साधेपणा आवडतो, माझे लग्न इस्कॉन मंदिरात होणार आहे आणि माझी इच्छा जशी होती, तसंच सगळं घडत आहे," असं आरती म्हणाली.ती पुढे म्हणाली, "सुरुवातीला मला वाटलं की काशी विश्वनाथला जाऊन लग्न करावे, पण नंतर विचार केला की खूप नातेवाईक आहेत, इंडस्ट्रीतील मित्र आहेत. माझ्याइतकेच तेही माझे लग्नासाठी उत्साहित आहेत. माझे मित्र म्हणतायत की तू नाही बोलावलंस तरी आम्ही तुझ्या लग्नाला येऊ. अंकिता लोखंडे प्रत्येक कार्यक्रमात असणार आहे. प्रिंस नरुला ऑस्ट्रेलियाला गेला, पण युविका माझ्या लग्नासाठी थांबली. मी ही नाती कमावली आहेत आणि मी खूप आनंदी आहे."आरतीच्या कामाबद्दल बोलायचं झाल्यास तिने 'मायका', 'थोडा है बस थोडा की जरुरत है', 'परिचय', 'उत्तरन', 'उडान', 'ससुराल सिमर का' यासारख्या टीव्ही मालिका केल्या आहेत. आरती शेवटची 'श्रावणी' मालिकेत दिसली होती. याशिवाय ती बिग बॉस १३ मध्येही सहभागी झाली होती.गोविंदाची भाची व अभिनेत्री आरती सिंह लवकरच लग्नबंधनात अडकणार आहे.

# सूर्या दादाच्या कॅचने फिरवली मॅच!

## सूर्याने सांगितली मिलरच्या मॅचविनिंग कॅचमागची गोष्ट

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**सूर्यकुमार यादवच्या एका कॅचने संपूर्ण सामना फिरला आणि प्रत्येक भारतीय क्रिकेट चाहत्याने सुटकेचा निश्वास सोडला. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील अंतिम सामन्यात सूर्यकुमार यादवने डेव्हिड मिलरचा झेल घेत भारताला टी-२० ट्रॉफी जिंकून दिली. त्याच्या शानदार झेलमुळे तो सामन्यातील बेस्ट फिल्डर ठरला. सूर्याचा तो झेल इतर कोणत्या खेळाडूंना नामांकन न देताच त्याला थेट विजेता घोषित केले.**





भारताच्या ड्रेसिंग रूममध्ये विजयानंतर एकच जल्लोष पाहायला मिळाला. भारताचे फिल्डिंग कोच टी दिलीप यांनी खेळाडूंना संबोधित केलं. अंतिम सामन्याच्या बेस्ट फिल्डरला मेडल देण्यासाठी बीसीसीआयचे सचिव जय शाह उपस्थित होते. जय शाह यांनी स्वत: त्याला पदक प्रदान केले. ज्याचा व्हिडिओही सोशल मीडियावर शेअर करण्यात आला आहे.डेव्हिड मिलर भारतासाठी घातक ठरत होता. २० षटकापर्यंत तो मैदानावर होता म्हणजे तो मोठा फटका खेळू शकतो याची सर्वांनाच कल्पना होती. पण त्यानंतर हार्दिक पंड्या शेवटच्या षटकात गोलंदाजी करायला आला. जिथे ६ चेंडूत १६ धावा हव्या होत्या. षटकाच्या पहिल्याच चेंडूवर डेव्हिड मिलरने बॅट स्विंग करून चेंडू सीमापार पाठवण्याचा प्रयत्न केला, पण सूर्यकुमार यादवने अप्रतिम झेल घेत डेव्हिड मिलरला बाद केले इतकेच नव्हे तर भारताच्या विजयाची शक्यताही वाढवली. सूर्याने धावत येत झेल टिपला पण तो त्याला सीमारेषेबाहेर पाय जाणार हे त्याला कळताच त्याने चेंडू फेकला आणि पुन्हा येऊन तो टिपला आणि भारताचा विजय पक्का केला. शेवटच्या षटकात सूर्यकुमार यादवने कागिसो रबाडाचा झेल टिपत भारताचा विजय आणखी पक्का केला. शेवटच्या चेंडूवर विजयासाठी ९ धावांची गरज होती पण शेवटच्या चेंडूवर फक्त एक धाव आली, त्यामुळे टीम इंडियाला ७ धावांनी टी-२० विश्वचषक २०२४ चे विजेतेपद पटकावण्यात यश आले.डेव्हिड मिलरच्या या शानदार झेलसाठी सूर्यकुमार यादव सामन्यातील सर्वोत्तम क्षेत्ररक्षक ठरला. ज्यासाठी बीसीसीआयचे सचिव जय शाह स्वतः भारतीय संघाच्या ड्रेसिंग रूममध्ये आले आणि त्यांना पदक प्रदान केले. बीसीसीआयने त्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केला आहे.टी-२० विश्वचषकाचे जेतेपद पटकावत भारतीय संघ वेस्ट इंडिजमधून ट्रॉफीसह भारतात परतणार आहे, तब्बल १७ वर्षांच्या प्रतिक्षेनंतर भारताने टी-२० विश्वचषकावर आपले नाव कोरले आहे, रोहित शर्माच्या नेतृत्त्वाखालील परफेक्ट संघाने ही मोहिम फत्ते करून दाखवली आहे. भारतीय संघाने अष्टपैलू कामगिरी करत दक्षिण आफ्रिकेवर हा विजय मिळवला आहे. या विजयाचे अनेक नायक आहेत. पण सूर्यकुमार यादवने टिपलेल्या झेलची सगळीकडे जोरदार चर्चा आहे. ३६० डिग्री फलंदाजी करणाऱ्या सूर्याने सीमारेषेवर असा काही झेल टिपला की सर्वांना आश्चर्याचा आणि सुखद धक्काही बसला कारण मिलरची विकेट संघासाठी खूपच महत्त्वाची होती.सूर्यकुमार यादव टी-२० विश्वचषक २०२४ च्या फायनलमध्ये डेव्हिड मिलरच्या मॅच-विनिंग कॅचबद्दल उघडपणे बोलतो. इंडिया टुडेला दिलेल्या खास मुलाखतीत त्याने हा खुलासा केला. मिलरने हार्दिक पंड्याच्या पहिल्या फुल टॉस चेंडूवर मोठा फटका मारला, हा चेंडू हवेत उंच उडाला आणि सीमारेषेच्या दिशेने गेला. तिथे सूर्यकुमार सीमारेषेच्या जवळ होता. क्षणभर असे वाटत होते की चेंडू सीमारेषा ओलांडून जाईल.

### असे अनेक झेल यशस्वीपणे टिपले

सूर्यकुमारने कमालीची कामगिरी करत अप्रतिम झेल घेत संघाला विजय मिळवून दिला.सूर्यकुमार झेलबद्दल म्हणाला, “आता हे सांगणं सोपं आहे, पण त्यावेळी असं वाटलं की चेंडू नाही ट्रॉफी सीमारेषा ओलांडून पलीकडे जात आहे. त्यावेळेला मला जे शक्य होतं ते सर्व केलं आणि त्या वेळी वारा देखील एक चांगला घटक होता. त्यामुळे मला थोडी मदत मिळाली. तसेच, आम्ही आमच्या क्षेत्ररक्षण प्रशिक्षकासोबत भरपूर सराव केला आहे आणि असे अनेक झेल यशस्वीपणे टिपले आहेत. त्यामुळे जेव्हा सामन्यात एवढा मोठा क्षण होतो, तेव्हा प्रसंगावधानत आपल्यासाठी खूप महत्त्वाची असते.” सूर्यकुमारने असेही सांगितले की एक क्षण असा आला की जेव्हा त्यांना वाटले की सामना आता त्यांच्यापासून दूर जात आहे.

---

# जगज्जेत्या टीम इंडियावर पैशांचा पाऊस

## ICC पाठोपाठ BCCI कडून ‘इतक्या’ कोटींचं बक्षीस

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**वर्षांचा दुष्काळ संपवून विश्वचषक उंचावला आहे. यंदाच्या टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेच्या संघावर मात करून जगज्जेतेपद पटकावलं आहे. भारताच्या या ऐतिहासिक विजयानंतर आयसीसीकडून टीम इंडियाला बक्षीस मिळालं आहेच, त्याचबरोबर आता भारतीय क्रिकेट नियामक मंडळानेही टीम इंडियासाठी मोठ्या बक्षीसाची घोषणा केली आहे. टीम इंडियासाठी १२५ कोटी रुपयांचं बक्षीस जाहीर केलं आहे. बीसीसीआयचे सचिव जय शाह यांनी याबाबतची माहिती दिली आहे.**




जय शाह यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट करून जगज्जेत्या भारतीय संघाचं अभिनंदन केलं आहे. तसेच त्यांच्यासाठी १२५ कोटी रुपयांच्या बक्षीसाची घोषणा करतान आनंद होत असल्याचं वक्तव्य केलं आहे. शाह यांनी म्हटलं आहे की टीम इंडियाने संपूर्ण स्पर्धेत असाधारण कामगिरी केली आहे. त्यांनी या स्पर्धेत त्यांची प्रतिभा आणि दृढनिश्चय दाखवला, त्यांनी खिलाडूवृत्तीचं दर्शन घडवलं, या अनन्यसाधारण कामगिरीसाठी संघातील सर्व खेळाडू, प्रशिक्षक आणि सपोर्ट स्टाफचं अभिनंदनदरम्यान, आयसीसीकडूनही टीम इंडियाला मोठं बक्षीस मिळालं आहे. आयसीसीने टी-२० विश्वचषकासाठी अंदाजे ९३.५ कोटी रुपये वितरित करण्याची घोषणा केली होती. त्यानुसार रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाला टी-२० विश्वचषक २०२४ चं विजेतेपद पटकावल्याबद्दल बक्षीस म्हणून २०.३६ कोटी रुपये मिळाले आहेत. तर उपविजेत्या दक्षिण आफ्रिकेचा संघालाही बक्षीस म्हणून १०.६४ कोटी रुपये मिळाले आहेतया संघांना (इंग्लंड आणि अफगाणिस्तान) प्रत्येकी ६.५५ कोटी रुपये, तर सुपर आठ फेरीपर्यंत पोहोचलेल्या संघांना प्रत्येकी ३.१८ कोटी रुपये मिळाले.

### खिलाडूवृत्तीचं दर्शन घडवलं

ग्रुप स्टेजमधील प्रत्येक सामना जिंकल्याबद्दल २५.९ लाख रुपयांचं बक्षीस जाहीर करण्यात आलं आहे.जय शाह यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट करून जगज्जेत्या भारतीय संघाचं अभिनंदन केलं आहे. तसेच त्यांच्यासाठी १२५ कोटी रुपयांच्या बक्षीसाची घोषणा करतान आनंद होत असल्याचं वक्तव्य केलं आहे. शाह यांनी म्हटलं आहे की टीम इंडियाने संपूर्ण स्पर्धेत असाधारण कामगिरी केली आहे. त्यांनी या स्पर्धेत त्यांची प्रतिभा आणि दृढनिश्चय दाखवला, त्यांनी खिलाडूवृत्तीचं दर्शन घडवलं, या अनन्यसाधारण कामगिरीसाठी संघातील सर्व खेळाडू, प्रशिक्षक आणि सपोर्ट स्टाफचं अभिनंदनदरम्यान, आयसीसीकडूनही टीम इंडियाला मोठं बक्षीस मिळालं आहे.